
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय सहावा , भाग पहिला

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय सहावा : भाग पहिला

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नम: ||

## अध्याय सहावा

# आत्मसंयमयोग

मग धृतराष्ट्रास संजय म्हणे । योग जो सांगितला श्रीकृष्णाने । घडेल तयाचे अधिक जाणणे । आता राया ||१||
भगवंत ब्रह्मज्ञान सांगतील । ते आम्हासही प्राप्त होईल । मग होईल ते समाधान । आमचेही ||२||
काय भाग्य आपुले आघवे । तहानलेल्याने पाणी मागावे । परी तया अमृतचि मिळावे । तैसे होईल आता ||३||
आता पहा अकारण । प्रकटेल येथे ब्रह्मज्ञान । आपण दोघे भाग्यवान । पहा राजा ||४||
त्यास धृतराष्ट्रे म्हणितले । ब्रह्मज्ञान मी तुज न विचारले । युद्धस्थानी काय चालले । सांग मजला ||५||
धृतराष्ट्राचे म्हणणे ऐकून । संजय गेला थक्क होऊन । म्हाताऱ्याचं मोहग्रस्त असणं । जाणले त्याने ||६||
डोळे आंधळेच राजाचे । कैसे ज्ञान व्हावे प्रकाशाचे । परि भान ठेवून राजसत्तेचे । तो गप्प राहिला ||७||
कृष्णार्जुन संवाद ऐकून । संजय गेला होता आनंदून । त्यासी होती ती तहान । आत्मज्ञानाची ||८||
आनंदास प्राप्त होऊन । भगवंताचा अभिप्राय जाणून । राजासी करेल निवेदन । संजय आता ||९||
गीतेच्या सहाव्या अध्यायात । ब्रह्मज्ञान आहे शब्दातीत । सागरमंथनी निघावे ते अमृत । तैसेच की ||१०||
तैसे गीतार्थाचे सार । ब्रह्मतत्त्व जे अपार । योग ज्ञानाचे ते भांडार । उघडेल आता ||११||
जेथे आदिप्रकृती विसावते । जेथे शब्दाचे काही न चालते । तेथूनी ज्ञान परम ते । प्रकटेल आता ||१२||
तो हा अध्याय सहावा । तुम्ही लक्ष देऊन ऐकावा । कल्याणकारी हा सांगावा । सर्वांसाठी ||१३||
माझा मराठाचि बोलु कौतुके । परि अमृतातेही पैजा जिंके । ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ||१४||
सोपी भाषा वापरेन । अंगी जिच्या नादपण । सुगंधाने जाईल ते मोहून । मन तुमचे ||१५||
प्रकटेल ऐसे रसाळपण । जिभा त्या करतील श्रवण । परस्पर इंद्रियात ते भांडण । लागेल आता ||१६||
शब्द विषय तो कानाचा । परि जीभ म्हणेल तो आमुचा । सांगेल हक्क शब्द सुगंधाचा । नाक आता ||१७||
पाहून शब्दांची उधळण । फिटेल डोळ्यांचंही पारणं । होईल तयाचं समाधान । शब्दरूप प्रकटता ||१८||
खोल अंतरी उभरे ज्ञान । मग मनी प्रकटे शब्द होऊन । करण्या तयांचे लिखाण । स्फुरती भुजा ||१९||
घडता शब्दांचे आस्वादन । सर्व इंद्रिय पावतील समाधान । जसं सूर्याचे ते उगवणं । प्रकाशवी जगा ||२०||
तैसे शब्दांचे व्यापकपण । तेथे गर्भितार्थ असाधारण । तया अंगी ते गुण । चिंतामणीचे ||२१||
शब्दाचे बनवून ताट । वाढेन आत्मज्ञान चोखट । निष्कामा समजेल ही भेट । अनायासे ||२२||
इंद्रियासी तादात्म्य तुटता । मनाचे मनपण संपता । आकळते ती आत्मसत्ता । अर्जुना अंतरी ||२३||
श्रवणाचे करून निमित्त । होऊ द्यावा मनाचा अंत । मग ज्ञान ते प्रकटतं । अंतरंगी ||२४||
शब्द ते अमूप ऐकून । जाईल मन ते निरसून । मग प्रकटेल ते ब्रह्मज्ञान । अर्जुना माझ्या ||२५||
ऐसे असेल ते निष्काम मन । तरच प्रकटेल आत्मज्ञान ।अन्यथा मुक्या-बहिऱ्याचं संभाषण । होईल हे ||२६||
मनाची ती निष्कामता । तीच ज्ञानाची रहस्यता । प्रकटते ती आत्मसत्ता । निष्काम मनी ||२७||
जया आत्मबोधाची तहान । ते स्वर्गसुखासी लाथाडून । निष्कामता ती पावून । ज्ञानी होती ||२८||
जयांची नाही निष्काम मती । ते या ग्रंथा समजू न शकती । जसे कावळे न ओळखती । चंद्रासी अर्जुना ||२९||
येथे निष्काम ते पात्र । आणि सकाम ते अपात्र । अनुभवती आत्मतत्त्व सर्वत्र । निष्काम मती ||३०||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

बोलण्याच्या त्या ओघात । जाहली पुनरुक्ती सतत । काय म्हणे तो भगवंत । ऐका आता ॥३१॥
आत्मतत्त्व न सापडते शब्दात ।बुद्धीही नाही तया आकळत ।केवळ गुरुकृपा प्रकाशात । आकलन तत्त्वाचे ॥३२॥
जेथे जाणीवही न पोहचते । ऐसे इंद्रियातीत तत्त्व ते । तयासीच आकळणे ते । ज्ञान अर्जुना ॥३३॥
धातुशास्त्रज्ञासही जे कठीण । तेथे लोखंडाचेही होते सुवर्ण । परिस जर सुदैवानं । आला हाता ॥३४॥
तैसी सद्गुरुकृपा होता । प्रकटते ती आत्मसत्ता । मजवरी अपार ती ममता । श्रीगुरुची ॥३५॥
तेणे कारणे मी बोलेन । शब्दी अरूपाचे रूप दाविन । इंद्रियातीत ते भोगवीन । इंद्रियांकरवी ॥३६॥
ऐसे यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे सहाही गुणवर्य । वसती जेथे ॥३७॥
ऐसा जो भगवंत दाता । जया अंगी संपूर्ण निष्कामता । तो म्हणे पार्था । देई चित्त ॥३८॥

श्री भगवानुवाच

योग आणि संन्यास । एकचि असती खास । वेगळेपणाचा तो भास । जरी तेथे ॥३९॥
योग तोच संन्यास । शब्दाकारणे वेगळेपणाचा भास । जैसे ब्रह्म आणि अवकाश । भेद नाही ॥४०॥
त्या शब्दाच्या भिन्नतेकारणे । उदक पाणी भिन्न न होणे । तैसे दोही मार्गे जाणे । एकचि ठायी ॥४१॥
पाणी वेगळाल्या भांड्यात भरता । आकाराकारणे भासते भिन्नता । तैसीच विविधता । योगसंन्यासाची ॥४२॥
असूनही त्या कर्मात । जो अंतरी असे अनासक्त । तया ज्ञानीजन म्हणतात । योगी अर्जुना ॥४३॥
जैसी कथा ती पृथ्वीची । उगवणी होते नाना वनस्पतींची । परि कामना ती फळाची । नाही पृथ्वीला ॥४४॥
आपुल्या त्या संस्कारानुसार । तेथे कर्मे घडती सत्वर । परि अंतरी निष्कामता अपार । त्याचे ठायी ॥४५॥
जे जे उचित ते ते करी । परि अहंभाव नाही उरी । बुद्धि त्याची फळावरी । जाईच ना ॥४६॥
ऐसे जयाचे आचरण । अर्जुना तोचि संन्यासी जाण । तयाचे ते निष्कामपण । खूण अर्जुना ॥४७॥
शरीराने जरी असे कर्म करत । परि मनी नसे तेच घोळत ।मग न अडके तो कर्मबंधात । निष्कामते कारणे ॥४८॥
टाळूनिया लेप एक । तेथे लावावा तो आणिक । ऐसे कर्म सदैव कर्मबंधक । नाही त्याचे ॥४९॥
तो राहो गृहस्थाश्रमात । वा त्या संन्यासाश्रमात । कामनांपासून जो अलिप्त । तो योगी अर्जुना ॥५०॥
म्हणून स्वकर्म न सोडता । कर्मबंधात न अडकता । असे योगसुख स्वभावता । निष्कामते ठायी ॥५१॥
संन्यास आणि योग अभिन्न । ऐसेच सर्व शास्त्रांचे प्रतिपादन । त्यांच्या ऐक्यतेचे गुणगान । ज्ञानी गाती ॥५२॥
निष्कामता प्रकटता अपार । भेटे संन्यास योगाचे सार । बाह्य गोष्टी त्या उपचार । जाण अर्जुना ॥५३॥
जर योग शिखर सर करणे । मग कर्माचीच पाऊलवाट चालणे । कर्मी घडे कर्म संपणे । निष्काम होता ॥५४॥
घडता यम नियमांचा आचार । होतसे मग आसन ते स्थिर । मग प्राणायामाचा आधार । घ्यावा अर्जुना ॥५५॥
मग प्रत्याहाराची बारी । बुद्धिही संपून जाय बिचारी । हठयोगीही जाती माघारी । जेथोनिया ॥५६॥
ऐसे अभ्यासाचे बळे । मन इच्छापासून होता निराळे । मग वैराग्य ते उजळे । जीवनी अर्जुना ॥५७॥
मन निर्विकल्प होता । प्रकटते धारणा जी एकाग्रता । मग ध्यानाची सहजता । त्याच्या अंतरी ॥५८॥
ऐसे निर्विकल्प होता । कामनांची होते सांगता । मग प्रकटते ती अद्वैतता । अंतरी त्याच्या ॥५९॥
मग आठवणीची पकड संपते । भविष्याची चिंता हरते । ऐसी समाधी ती साधते । योग्या अर्जुना ॥६०॥
ऐसी समाधी साधणे । नि योगारूढ ते होणे । ऐक बा ती लक्षणे । योग्याची आता ॥६१॥
जयाचे त्या मनी । नाही इंद्रिय-विषयांची धुनी । जाण तो आत्मज्ञानी । अर्जुना तू ॥६२॥
सुखदु:खाचे प्रसंग घडता । जयाची न भंगते ती स्थिरता । ऐसी ती निर्विकल्पता । लक्षण त्याचे ॥६३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

इंद्रिये कर्मी रत दिसती ।परि फलेच्छेची नाही आसक्ती । ऐसी आंतरबाह्य ती स्थिती । तो योगी अर्जुना ॥६४॥
असूनही तो देहात । अनासक्त जो मनइंद्रियात । तोच लीन आत्मतत्त्वात । जाण अर्जुना ॥६५॥
ऐसे वर्णन ऐकून । चकित जाहला अर्जुन । म्हणे कोणाच्या त्या कृपेनं । ही स्थिती भगवंता ॥६६॥
तेव्हा म्हणाला श्रीकृष्ण । नवलाईचं तुझं बोलणं । आत्मतत्त्वाची ती देवाणघेवाण । होते का कधी ॥६७॥
स्वसंमोहनाच्या कारणे । आपणचि भ्रमित होणे । मग जन्ममृत्यू ते भोगणे । बेहोषी ठायी ॥६८॥
मग बेहोषातून जागता । होते भ्रमाची ती सांगता । मग जन्ममृत्यूची कथा । संपून जाई ॥६९॥
ऐसे आपलेच आपण । करतो घात वा कल्याण । मीपणाच्या भ्रमाकारण । दु:ख अर्जुना ॥७०॥
निष्काम सजगता साधून । संपू द्यावं मीपणाचं भासणं । मग ब्रह्ममय ते होणं । आपोआप ॥७१॥
स्वत:स देह मानणं । आपणच आपुला वैरी होणं । ते किड्याचं कोशबद्ध होणं । जसं अर्जुना ॥७२॥
जसे प्राप्तिचिये वेळे । निर्दैवा आंधळेपणाचे डोहाळे । आपणचि आपुले डोळे । झाकी जैसा ॥७३॥
ऐसे अज्ञानाकारण । मी देह असे बरळणं । मग देहासी येता मरण । अतिदु:ख अर्जुना ॥७४॥
एऱ्हवी ते आत्मतत्त्व चिरंतन । परि त्यासी त्याचे विस्मरण । जैसे स्वप्नास सत्य मानून । बरळणे ते ॥७५॥
जशी ती पोपटाची कथा । नलिकेवर जाऊन त्या बसता । गरकन जरी नळी ती फिरता । न सोडे तिजसी ॥७६॥
आता म्हणे कैसी । सोडावी त्या नलिकेसी । सोडता त्या नलिकेसी । आत्मघात आता ॥७७॥
ऐसे होऊन पंखांचं विस्मरण । नळीस अधिकच घट्ट पकडणं । मग उडण्याचे ते ज्ञान । विसरून जाई ॥७८॥
ऐसा आपणच आपला भ्रमला । सांग त्यासी कुणी का बांधिला । मग न सोडीच जरी नेला । तोडून अर्धा ॥७९॥
म्हणून देहास मी मानणे । ते आपण आपले शत्रू होणे । आणि आत्मतत्त्वास जाणणे । कल्याण अर्जुना ॥८०॥
जयाने जिंकले स्वत:चे मन । सकल कामनांचे शमन । मग तो आणि भगवान । भेद नाही ॥८१॥
हिणकसपणा तो जळता । उरे सोन्याची ती शुद्धता । तैसे सर्व संकल्प लोपता । ब्रह्मप्राप्ती ॥८२॥
जैसे घट तो फुटता । आत बाहेरील पोकळीची ऐक्यता । तैसे इच्छा त्या संपता । मोक्ष घडे ॥८३॥
पृथक अहंभाव संपता । प्रकटते वैश्विक एकात्मता । ऐसी वैश्विक चैतन्य सत्ता । अनुभवा येई ॥८४॥
तेथे नसे शीत उष्ण विभागणी । वा सुखदु:खाची उजळणी । मानापमानाची कहाणी । नाही तेथे ॥८५॥
घडता सूर्याचं उगवणं । होते प्रकाशाची उधळण । तैसे भेटता कोणीपण । म्हणे तो मीच ॥८६॥
ढगातील त्या पाऊसधारा । त्या न बोचती जशा सागरा । तैसा शुभाशुभास थारा । तेथे नाही ॥८७॥
देहइंद्रियासी तादात्म्य तोडून । विरते जेधवा मनाचे मनपण । मग ज्ञानी आणि ज्ञान । भिन्न नाही ॥८८॥
मग मी-तू-पणाची भाषा विरते । असणे नसणेपण संपते । ऐसे अनुभवता आत्मतत्त्वाते । अद्वैत बुद्धी ॥८९॥
ऐसा जितेंद्रिय होता । प्रकटते ती ब्रह्ममयता । मग श्रेष्ठ आणि कनिष्ठता । भाव नाही ॥९१॥
ऐसी अनुभवता अद्वैत स्थिती । समत्व पावते ती मती । मग सोने आणि माती । भेद नाही ॥९२॥
मौल्यवान या पृथ्वीहून । ऐसे सापडले जरी रत्न । तरी तया महत्त्व दगडाहून । न देई तो ॥९३॥
आपला आणि परकेपणा । मित्र आणि शत्रूपणा । ही भावभेदाची कल्पना । तेथे नाही ॥९४॥
भावना न उरली आसक्तीची । नच तेथे बुद्धी द्वेषाची । मीच विश्व ऐसी जयाची । मती झाली ॥९५॥
मग तयाच्या दृष्टीत । अधम उत्तम भेद नसे उरत । जसे परिसाचे स्पर्शीत । सोने सगळे ॥९६॥
परीस जैसे लोहा सुवर्ण करी । तैशी याची बुद्धि चराचरी । जी जगतालाच ब्रह्म करी । अवघ्या साऱ्या ॥९७॥
जगी जे जे दिसे । ते सर्व ब्रह्मचि असे । ऐसी तयाची अनुभूती असे । अंतरामाजी ॥९८॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे अंतरी जाणता । न उरेच मग ती भिन्नता । अंतरी अनुभवली एकता । सर्वांठायी ॥९९॥
जैसे नाना वस्त्रांचे दिसणे । तेथे सुताविण काहीच नसणे । तैसे हे जग असणे । ब्रह्ममय सारे ॥१००॥
ऐसी प्रतिती ती येता । अंतरी अनुभव तो प्रकटता । मगच येते ती निष्कामता । बुद्धिठायी ॥१०१॥
मग तीर्थ असे तेथेचि । वाट दाखवी जो मुक्तीची । अनुभूती ती ब्रह्ममयतेची । त्याच्यासंगे ॥१०२॥
तयाचे बोल ते अमृत । प्रेमरस पाझरे दृष्टीत । येणे तयाच्या त्या संगतीत । ते भाग्य अर्जुना ॥१०३॥
तयाचे बोल ऐकता । प्रकटते ती ब्रह्ममयता । ऐसी असे विशेषता । बोलात त्याच्या ॥१०४॥
अद्वैती स्थिर होता मन । विरतसे द्वैताचे ते बंधन । मग आत्मतत्त्व ते चिरंतन । स्वयेचि झाला ॥१०५॥
ऐसी दृष्टी प्रकटता नवीन । तेथे नसे कशाचच मागणं । ऐसी निष्कामता प्रकटणं । ती ब्रह्ममयता ॥१०६॥
ऐसे असाधारणपणे । सांगितली ज्ञान लक्षणे । अर्जुनावरील त्या प्रीतीकारणे । भगवंतानी ॥१०७॥
ऐसा भगवान श्रीकृष्ण तात ।सर्वांच्या डोळ्यातून जो असे पहात ।तयाच्याच त्या संकल्पात ।प्रकटन विश्वाचे ॥१०८॥
ब्रह्ममयता ती अनुभवून । प्रकटली ती वेदपुराण । परि करण्या ओंकाराचे वर्णन । शब्द अपुरे ॥१०९॥
तयाच्याच तेजाकारणे । चंद्रसूर्याचे ते असणे । विश्वाचे ते प्रकटणे । त्याचीच लीला ॥११०॥
काय करू तयाचे वर्णन । तेथे भासे आकाशही लहान । आकळणे तयाचे ते गुण । ते भाग्य अर्जुना ॥१११॥
पुरे झाले हे बोलणे । तयाचे शब्दी ते न येणे । तरी सांगितली ती ज्ञान लक्षणे । तुजला अर्जुना ॥११२॥
जी द्वैताची ठाव फेडी । ती ब्रह्मविद्या जर केली उघडी । तर माझी अर्जुनासी आवडी । नासेल बा ॥११३॥
म्हणून टाळले अद्वैत बोलणे । बोलण्यात आडपडदा लावणे । मन राहू दिले मनपणे । भोगावया ॥११४॥
पाहून प्रेम अर्जुनाचे । टाळून बोलणे मुक्तीचे । नाटक ते द्वैताचे । सुरूच ठेवले ॥११५॥
जर याचा अहंभाव जाईल । तो मीच जर होईल । मग मी एकटाच राहील । या जगती ॥११६॥
जयासी प्रेमाने ते पहावे । का तोंडभरून बोलावे । वा प्रेमाने अलिंगन द्यावे । असा कोण आहे ॥११७॥
गोष्ट जी होई मनी मावेनाशी । मग चावळावी ती कोणाशी । जर पावला ब्रह्ममयतेशी । अर्जुन माझा ॥११८॥
ऐसा काकुळतीस येऊन । अन्य उपदेश केला श्रीकृष्णानं । परि तयाच ते बोलणं । प्रेमापायी ॥११९॥
विचित्र वाटेल हे ऐकून । पण कृष्णा आवडत होता अर्जुन । म्हणून ते द्वैतपण । ठेवले तैसे ॥१२०॥
पन्नाशीच्या शेवटी । जर अपत्य विये वांझोटी । मग मोहमायेची दाटी । अंतरी तिच्या ॥१२१॥
पाहून भगवंताचं ते वागणं । मी तरी तसेच म्हणेन । गेला होता तो मोहून । अर्जुनाठायी ॥१२२॥
पहा हे नवलपण । रणांगणी उभे राहून । सांगणे अर्जुनास ते ज्ञान । ती कृष्णलीला ॥१२३॥
आवड जर लाजवी । व्यसन जर शिणवी । पिसे जर न भुलवी । तरी ते तेच नाही ॥१२४॥
भावार्थ घ्या तो जाणून । अर्जुन सख्यत्त्वाची खूण । जाहला तो दर्पण । भगवंतासाठी ॥१२५॥
अर्जुना सांगितले सार । जो सज्ज जाण्या भवचक्रापार । जसे शेत ते तयार । पेरणीसाठी ॥१२६॥
अवस्था आत्मनिवेदना आधीची । जी पीठिका होय सख्याची । तेथे बैठक अर्जुनाची । आधीच गा ॥१२७॥
स्वामीचे गुण न वर्णीजे । नि सेवकाचे गुण गायीजे । ऐसा अर्जुन सहजे । आवडे भगवंता ॥१२८॥
पत्नी सेवा करी पतीची । म्हणून ती पतीच्या आवडीची । स्तुती ऐशा पतिव्रतेची । लोक करती ॥१२९॥
वाटते स्तवावे अर्जुनास । जो आवडे भगवंतास । पात्र जो जाहला प्रेमास । भगवंताच्या ॥१३०॥
जयाच्या प्रेमाकारणे । अमूर्तही मूर्त होणे । त्या भगवंतासही लागणे । ध्यास त्याचा ॥१३१॥
तेव्हा श्रोते ते म्हणाले । पहा काय सुदैव उगवले । शब्दाने नादब्रह्मासही जिंकले । आज येथे ॥१३२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

काय नवल हे देशी । मराठी बोलावी ती ऐशी । जसे रंग उधळले आकाशी । साहित्याच्या ॥१३३॥
पडले नवकल्पनांचे चांदणे । भाव प्रकटला शीतलपणे । आणि कमळांचे ते उमलणे । तो श्लोकार्थ ॥१३४॥
जागवी जी ब्रह्मज्ञानाची आस । ऐसी भाषा प्रकटली खास । भेट अलौकिक जी आम्हास । श्रोतियां लागी ॥१३५॥
ते निवृतिदासानी जाणले । मग अवधान द्या म्हणाले । जे भगवंताने उपदेशिले । ऐकू आता ॥१३६॥
देवकीने उदरी वाहिला । यशोदेने तो वाढविला । शेवटी उपयोगासी आला । पांडवांच्या ॥१३७॥
मनातील प्रश्न आता । कैसा विचारू भगवंता । ही ती न पडली चिंता । अर्जुना कधी ॥१३८॥
मग अर्जुन तो म्हणे । देवा तू सांगितली ज्ञान लक्षणे । तयांचे ते नसणे । माझीया ठायी ॥१३९॥
ती ज्ञानलक्षणे पाहता । दिसे मी अपुराच पुरता । परी तुझी कृपा ती होता । अशक्य काय ॥१४०॥
जर तुझी कृपा प्रकटेल । तर मी ब्रह्मही होईल । तू जे जे सांगशील । ते करीन मी ॥१४१॥
ऐकून ती ज्ञानलक्षण । प्रसन्न जाहले अंत:करण । ऐसी ब्रह्ममयता ती अनुभवणं । ते भाग्य देवा ॥१४२॥
देवा तू स्वामी जगाचा । दे मज अनुभव ब्रह्ममयतेचा । शिष्य नाही का मी तुमचा । सांगा देवा ॥१४३॥
मनी संतोष नसता । असते सुखाची ती उणीवता । संतोष तो प्राप्त होता । सुख चोहीकडे ॥१४४॥
जो लाडका असे देवाचा । तया सहज अनुभव ब्रह्ममयतेचा । उगवला क्षण भाग्याचा । अर्जुनासाठी ॥१४५॥
हजारो ते जन्म घेऊनही । प्राप्त नाही इंद्रादिकांनाही । देईन देव ती ब्रह्ममयताही । अर्जुना आता ॥१४६॥
व्हावे मी ब्रह्मज्ञानी । आले जे अर्जुनाच्या मनी । भगवंत ते जाणुनी । प्रसन्न झाला ॥१४७॥
मनी वैराग्य प्रकटले । इंद्रियासी तादात्म्य तुटले । ऐसे भाग्य अर्जुनाचे उजळले । आज येथे ॥१४८॥
पाहून तो वैराग्यभाव । मनी प्रसन्न झाला देव । म्हणे आता आत्मज्ञानाचे ते गाव । दूर नाही ॥१४९॥
हा प्राप्त झाला वैराग्यास । मनइंद्रियांची तुटली आस । म्हणून पात्र आत्मज्ञानास । अर्जुन आता ॥१५०॥
आता मी जे जे सांगेल । ते सर्वही हा करील । मग ते प्राप्त होईल । ज्ञान तयासी ॥१५१॥
ऐसा तो विचार करून । म्हटलं मग भगवंतानं । अर्जुना देऊनिया अवधान । ऐकावे आता ॥१५२॥
सर्व प्रवृत्ती त्या संपता । मन इच्छांची होता सांगता । येतसे निवृत्तिफळ हाता । योगीयांच्या ॥१५३॥
जयांनी हे जाणले । ते विहंगम मार्गी निघाले । जयानी मनी अवधान ठेविले । अनायासे ॥१५४॥
मन इंद्रियासी निष्काम होणे । मनी अवधान ठेवणे । मन इच्छा सोडणे । ते सूत्र अर्जुना ॥१५५॥
याचमार्गे योगी आले । साधकांचे सिद्ध झाले । आत्मतत्त्वी ते स्थिरावले । योगी ऐसे ॥१५६॥
हा मार्ग जो अवलंबणे । मग तहानभूक विसरणे । रात्रंदिवस अवधान ठेवणे । अनुभवाठायी ॥१५७॥
क्षणोक्षणी जी येई अनुभूती । तेथे योगी निर्विकल्प रहाती । ऐसी आत्मज्ञानाची वाट ती । सोपी अर्जुना ॥१५८॥
ऐसे अनुभवांच्या प्रति । जे निर्विकल्प रहाती । तया होते ती प्राप्ती । आत्मज्ञानाची ॥१५९॥
अनुभवी निर्विकल्प रहाता । होते अनुभवांची सांगता । द्वैतातील अनुभव संपता । ब्रह्मप्राप्ती ॥१६०॥
तेथे पार्थे म्हणितले देवा । मज येईल अनुभव केव्हा । ब्रह्मज्ञानाचा तो ठेवा । दे मजसी ॥१६१॥
श्रीकृष्ण म्हणे अर्जुनासी । ब्रह्मज्ञान न होते उतावळ्यासी । योग प्राप्तीच्या त्या मार्गासी । ऐक आता ॥१६२॥
जे मी सांगेल आता । धन्य होशील ते अनुभवता । जेथे असेल एकांतता । ते निवडावे स्थान ॥१६३॥
त्या ज्ञान तळमळी कारणे । एकांती जाऊनी बैसणे । मनइंद्रियांसी विरक्त होणे । पात्रता अर्जुना ॥१६४॥
संतानी जो मार्ग चोखाळला । त्यासीच म्हणावे बा आपुला । मन-इच्छांच्या त्या भरीला । पडू नये ॥१६५॥
आपला आपण अभ्यास करी । अवधान ठेवूनी आंत बाहेरी । निष्काम होणे अंतरी । साधना अर्जुना ॥१६६॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे एकांत स्थान निवडणे । मनोरथ वैराग्याचे असणे । मग अज्ञान्यासही ज्ञान होणे । शक्य अर्जुना ॥१६७॥
थोडा सकाम जरी जाहला । तो जर एकांती राहिला । मग आपोआप तो निवाला । मन-इच्छातून ॥१६८॥
ऐसी एकांताची महती । मन-इच्छा विरून जाती । मग प्रकटते ती विरक्ती । आपोआप ॥१६९॥
विषयभोग ते सोडावे । ऐसे निवांतचि रहावे । असेच सतत ते वाटावे । योग्या अंतरी ॥१७०॥
ऐसी ही एकांतता । तेथे प्रकटते ब्रह्ममयता । द्वैताची संपता सत्ता । अद्वैत प्रकटे ॥१७१॥
ऐसे निवडावे स्थान । जेथे वसती साधकजन । प्रापंचिकांचं ते येणं-जाणं । जेथे नाही ॥१७२॥
त्या अमृताच्या प्रमाणे । ज्यांचे मूळासकट गोड असणे । अशा वृक्षांची ती वने । असावी तेथे ॥१७३॥
पावला पावलावर पाणी । असावे ते ठिकठिकाणी । सर्वकाळ झऱ्यांचे स्वच्छ पाणी । उपलब्ध जेथे ॥१७४॥
कोवळे असे जेथे ऊन । मंद शीतल तो पवन । ऐसे सुंदर वातावरण । असावे तेथे ॥१७५॥
स्थान नि:शब्द बहुतकरुनी । जेथे क्वचितच हिंस्त्र प्राणी । भुंगे पोपटाची गाणी । नसावी तेथे ॥१७६॥
सरोवरी असावे हंस । चार दोन पक्षी सारस । असावा तो सहवास । कोकिळेचाही ॥१७७॥
जरी नसले ते निरंतर । तेथे असावे ते मोर । त्यांच्या नृत्याचा बहार । वर्षाकाळी ॥१७८॥
ऐसा निवडावा परिसर । जेथे असावे मठ वा मंदिर । परि शांततेचा वावर । अखंड जेथे ॥१७९॥
ऐसे आपुल्या आवडीप्रमाणे । एकांती स्थिर रहाणे । मनी समत्व ठेवणे । ती साधना अर्जुना ॥१८०॥
मन एकांती रमले असता । मनी प्रकटते ती शांतता । ऐसे स्थान ते भेटता । रचावे आसन ॥१८१॥
भूमीवर तृणांकुर पसरवावे । त्यावर स्वच्छ वस्त्र टाकावे । मग मृगजीन ते अंथरावे । त्याचेवरी ॥१८२॥
कोमल असावे तृणदल । बैठक असावी ती समतल । ऐसे आसन ते अचल । असावे अर्जुना ॥१८३॥
आसन जास्त उंच असता । कमी होते शरीराची स्थिरता । आसन भूमिलगत असता । लागती भूमिदोष ॥१८४॥
म्हणून तैसे न करावे । आसन योग्य निवडावे । मग आपण ते बसावे । साधनेलागी ॥१८५॥
मग तेथे आपण । एकाग्र करून ते अंत:करण । करुनी सद्‌गुरु स्मरण । बैसावे ध्याना ॥१८६॥
सद्‌गुरूंसी स्मरता । प्रकटते आत बाहेर सात्त्विकता । मग मीपणाचा ताठा । विरू लागे ॥१८७॥
विषयांचा विसर पडणे । इंद्रियांच्या सवयी सुटणे । मनाचे मनपण विरणे । ते ध्यान अर्जुना ॥१८८॥
ऐसी समज असता । साधते ती ध्यानावस्था । शरीर मनाची स्थिरता । ते सूत्र अर्जुना ॥१८९॥
आसन ते स्थिर होणे । श्वासासी एकाग्रता साधणे । मनी अवधान ठेवणे । ध्यान अर्जुना ॥१९०॥
मनाच्या प्रवृत्ति सरता । प्रकटते समाधीची सहजता । स्वप्न सुषुप्ति ओलांडता । ज्ञान होई ॥१९१॥
कैसे बसावे आसन घालून । ऐक तू लक्ष देऊन । पोटऱ्या मांड्यासी चिटकवून । बसावे ध्याना ॥१९२॥
पायांचे ते तळवे । मांडीखाली घट्ट घालावे । असे दृढ ते असावे । आसन अर्जुना ॥१९३॥
आसन ते दृढ असता । प्रकटते शरीराची स्थिरता । शरीराची निश्चलता । अनिवार्य अर्जुना ॥१९४॥
ऐसी निश्चलता साधून । मान पाठ ताठ ठेवून । मग सिद्ध होते ते आसन । तेव्हा अर्जुना ॥१९५॥
काही ते साधकजन । बसती मूलबंध घालून । तया म्हणती वज्रासन । दुसरे कोणी ॥१९६॥
अनेक असती आसनांचे प्रकार । त्यास देऊ नये महत्त्व फार । स्थिर होणे ते शरीर । सूत्र अर्जुना ॥१९७॥
ऐसी बैठक साधता । येते शरीर मनास स्थिरता । शरीर मन स्थिर होता । योग प्राप्ती ॥१९८॥
ऐसी मुद्रा ती घडे । मनाची प्रवृत्ती मोडे । मनोसंकल्पाचे घोडे । थांबूनी जाये ॥१९९॥
ऐसे स्थिर होता मन । मावळू लागे आपणहून । संपता मनाचं मनपण । योग अर्जुना ॥२००॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे बसून बैठकीत । श्वासासी एकाग्रता साधत । योगी असे करत । ध्यान अर्जुना ॥२०१॥
पाठीचा कणा ताठ होऊन । स्थिर राहे ती मान । दोन्ही ते नयन । मिटू लागती ॥२०२॥
वरची ती पापणी झुकते । नि खालची तशीच रहाते । असे अर्धवट उघडून नयनाते । योगी ध्यानकरी ॥२०३॥
ऐसी नासाग्रावर दृष्टी ठेवून । साधती एकाग्रता साधकजन । एकाग्र होणे मन । अनिवार्य अर्जुना ॥२०४॥
ऐसे अंतर्मुख होणे । बहिर्मुखता ती संपणे । मनी अवधान असणे । ते ध्यान अर्जुना ॥२०५॥
स्थिर होता ते मन । संपे मनाचे वढाळपण । चिंता इच्छांचं असणं । संपून जाई ॥२०६॥
मग कंठनळी आटते । हनुवटी गळ्यासी लागते । जशी छातीसी दाब देते । ती अर्जुना ॥२०७॥
जेधवा कंठमणी लोपतो । मग योगबंध घडतो । ऐसा जालंधर बंध तो । मुक्तिदायी ॥२०८॥
बेंबी ती वर येते । नि पोट खपाटीस जाते । मग हृदयकमल विकसते । अंतरी अर्जुना ॥२०९॥
ऐसे स्वाधिष्ठान चक्राकाठी । नि नाभीच्या त्या तळवटी । बंध जो आता प्रकटी । तो उड्डीयाण ॥२१०॥
ऐसे या शरीरास । घडता शिस्तीचा अभ्यास । मनाच्या मनपणास । सुरुंग लागे ॥२११॥
कल्पना ती निमे । मनप्रवृत्ती शमे । मग मन ते रमे । विरक्तीमाजी ॥२१२॥
भूक काय जाहली । निद्रा केऊती गेली । ही आठवणही हारपली । तेथे अर्जुना ॥२१३॥
जो मूळबंधे कोंडिला । अपान माघौता मुरडला । मग तेथेच तो संकोचला । पहा अर्जुना ॥२१४॥
क्षोभलेपणे माजे । कोंडल्याठायी गाजे । मणिपूर चक्रासी झुंजे । मग तो अर्जुना ॥२१५॥
मग वावटळ प्रकटते । अंतरी शरीरासी ढवळते । ऐसी ती घालवते । दोष अर्जुना ॥२१६॥
भीतरी जोर ती करे । कोठ्यामाजी संचरे । मग कफपित्ताचे थारे । उरो नेदी ॥२१७॥
सप्तधातूस ती उलंडी । मेदाचे पर्वत फोडी । आतली मज्जा काढी । हाडातील ॥२१८॥
नाडी होईल बेताल । गात्रे होती ते शिथिल । साधका घबराट ती होईल । परि भ्यावेच ना ॥२१९॥
ऐशा व्याधि प्रकटतील । सवेचि नष्टही होतील । दोष शरीराबाहेर पडतील । ऐसे अर्जुना ॥२२०॥
नागाचे ती पिले । कुंकुमे जे नहाले । वेटोळे घालून बैसले । तैसे अर्जुना ॥२२२॥
ऐसी ती कुंडलिनी । वेटोळे साडेतीन घालूनि । जशी अधोमुख सर्पिणी । झोपली असे ॥२२३॥
विजेची ती कडी । वा अग्नीची घातली घडी । ती सोनियाची लगडी । घोटीव जशी ॥२२४॥
जी होती झोपली । आपल्याच ठिकाणी दाटली । तीच आता उठली । होऊनी सावध ॥२२५॥
ते नक्षत्र जैसे उलंडले ।की सूर्याचे आसन मोडले । वा तेजाचे बीज अंकुरले । तैसे अर्जुना ॥२२६॥
तैसे आळस तो झाडून । सर्व अंग मोडून । होते ते जागरण । कुंडलिनीचे ॥२२७॥
बहु दिवसाची भुकेली । जी डिवचून जागी केली । ती नागीण बा उभारली । तैसी अर्जुना ॥२२८॥
मग हृदयकोशा तळवटी । जाये त्या पवनाचिये भेटी । घालूनी तयासी मिठी । गिळी त्याते ॥२२९॥
मग स्वयेच्या तेजाते । ती शरीरभर पसरवते । मांसाची शुद्धी करते । सर्वदूर ॥२३०॥
जेथे जेथे आहे मांस । तेथे घेते ती दोन घास । शुद्ध करते ती हृदयास । ऐसी अर्जुना ॥२३१॥
मग तळवे तळहात शोधी । वरचा भागही भेदी । ऐसी शुद्धता ती साधी । शरीरात ॥२३२॥
ती अधोभागही न सोडी । नखातीलही दोष काढी । धुऊनी त्वचा जोडी । सापळ्यासी ॥२३३॥
अस्थीच्या नळ्या निरपते । नि शिराही सर्व ओरपते । करपून ती टाकते । केस बीजा ॥२३४॥
ऐसे सप्तधातूचे करून शोधन । भागवी आपली ती तहान । ऐसी शुद्धी प्रक्रिया महान । कुंडलिनी ॥२३५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

---

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान ®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०